# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ३५०/२०२०**

**विषय : नाटयाचार्य खाडीलकर पारितोषिक सन २०२०—२१**

पीएच.डी. प्रबंधासाठी मराठी नाटक आणि रंगभूमी या विषयी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून वरील पारितोषिकासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. पारितोषिकाची एकूण रक्कम रू. ६,९००/— पुढीलप्रमाणे देण्यात येईल.

| | |
|---|---|
| संबंधित ग्रंथ खरेदीसाठी | रूपये ४६००/— |
| रोख रक्कम | रूपये २३००/— |

संशोधन कार्यास उपयुक्त ठरतील अशा ग्रंथांची खरेदी झाल्यावर सदर ग्रंथ कै. नाटयाचार्य खाडीलकर पारितोषिक निधीतून घेण्यात आले आहेत, अशी नोंद त्या खरेदी केलेल्या ग्रंथावर राहील. संशोधन कार्य संपताच किंवा कोणत्याही कारणाने संशोधन थांबविल्यास खरेदी केलेले ग्रंथ जयकर ग्रंथालयास परत करावयाचे आहेत.

१. अर्जासोबत अर्जदाराने २०० ते ३०० शब्दात आपल्या संशोधन विषयासंबंधीची रूपरेषा सादर करावी. तसेंच संशोधनासंबंधीचा अहवाल मार्गदर्शकाव्दारे विद्यापीठास पाठवावा.

२. मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या संशोधनासंबंधी स्वतंत्र अहवाल अर्जासोबत सादर करावा.

इच्छूक संशोधक विद्यार्थ्यांनी पारितोषिकासाठी अर्ज शैक्षणिक प्रवेश विभागाकडे दि. ०४ जानेवारी २०२१ पर्यंत प्रत्यक्ष हस्तपोच सादर करावेत.

18/12/2020

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ०७
संदर्भ : शै. प्रवेश/२४७५
दिनांक : १८/१२/२०२०

प्रत माहिती :—

१. मा. विभागप्रमुख, ललित कला केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे— ०७

२. मा. विभागप्रमुख, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—०७
“मराठी नाटक आणि रंगभूमी” या विषयातील मार्गदर्शक यांनी हे परिपत्रक कृपया वरील विषयाच्या संशोधक विद्यार्थ्यांच्या नजरेस आणावे.

D:\SPPU SCHOLARSHIP DATA\2019-20\Award\khadilkar\Circular